विषय : सहकाराचा विकास

प्रकरण २

भारतातील कृषी सहकारी संस्था

Agriculture Co-operatives in India

प्रा. महादेव कांबळे
सहाय्यक प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख
भोगावती महाविद्यालय, कुरुकली

सहकारी विपणन संस्था (Co-operative Marketing Societies)

प्रास्ताविक :

शेतकऱ्यांच्या उत्पादनास योग्य किंमत मिळावी व त्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करावे या हेतूने उत्पादनाच्या खरेदी-विक्रीसंबंधीची सर्व कार्ये पार पाडण्यासाठी स्थापन झालेल्या व सहकारी तत्त्वानुसार कार्य करणाऱ्या संस्थेस सहकारी विपणन किंवा खरेदी-विक्री संस्था असे म्हणतात. शेतकरी आणि ग्राहक वर्ग किंवा उपभोक्ता यांच्यातील मध्यस्थांचे उच्चाटन करून शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करणे आणि मालाचे एकत्रीकरण करण्याच्या कार्यापासून विक्री कार्यापर्यंतची सर्व कार्ये किमान खर्चात पार पाडणे हा या संस्थांचा उद्देश असतो. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांस उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहन देण्याबरोबर दर्जेदार मालाची निर्मिती करणे व त्याद्वारे ग्राहकांच्या हिताचेही रक्षण करण्याचे कार्य ही संस्था करते.

सहकारी विपणन संस्था व्याख्या

रिझर्व्ह बँकेने केलेल्या व्याख्येनुसार,

'खाजगी व्यापाऱ्यांपेक्षा अधिक किफायतशीरपणे उत्पादनाची खरेदी-विक्री करण्याच्या हेतूने सभासदांना मदत करण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी विपणन संस्था होय.'

'विपणनविषयक कार्ये करण्याच्या दृष्टीने उत्पादकांनी सहकारी तत्त्वावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी विपणन संस्था होय.' मार्गरेट दिग्बी यांच्या शब्दांत, 'सहकारी विपणन ही एक अशी यंत्रणा आहे की, ज्यामध्ये उत्पादक शेतकरी उत्पादकांपासून ग्राहकांपर्यंत वस्तू पोहोचविण्याच्या कार्यातील काही किंवा सर्व प्रक्रिया पार पाडण्यासाठी एकत्र येतात. '

सहकारी विपणन संस्थांचे उद्देश

(Objectives of Co-operative Marketing Societies)

१. शेतकऱ्यांची सौदाशक्ती बळकट करणे व त्यात वाढ करणे.

२. सभासदांच्या उत्पादनांना अधिक किंमत मिळवून देणे.

३. वाटप साखळीतून मध्यस्थांचे उच्चाटन करणे.

४. सभासदांना गरजेनुसार कर्जपुरवठा करणे.

५. सभासद शेतकऱ्यांना दर्जेदार मालाचे उत्पादन करण्यास प्रोत्साहन देणे.

६. किमतीचे स्थिरीकरण करणे.

७. सभासदांच्या शेतमाल उत्पादनाच्या संग्रहणाची व्यवस्था करणे.

८. शेतमालाच्या एकत्रीकरणाची व वाहतुकीची व्यवस्था करणे.

९. शेतमालाची प्रतवारी करणे.

१०. शेतमालाच्या आधारे किंमत धोरणाची अंमलबजावणी करणे.

११. शेती उत्पादनवाढीसाठी शेतीच्या सुधारित पद्धतींची सभासदांना माहिती देणे तसेच सुधारित बी-बियाणे, खते, जंतुनाशके इत्यादींचा वाजवी दरात पुरवठा करणे.

१२. सभासदांना परस्पर साहाय्य व काटकसरीची सवय लावणे.

१३. विपणन व पतपुरवठा संस्थांच्या कार्यात सांगड घालणे व थकबाकीचे प्रमाण कमी करण्यास मदत करणे..

१४. बाजारातील गैरव्यवहार व अनिष्ट व्यापारी प्रवृत्ती इत्यादींना आळा घालणे.

१५. ग्रामीण जनतेस जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे.

१६. धान्य वसुली कार्यक्रमात सरकारला मदत करणे.

सहकारी विपणन संस्थांची कार्ये (Functions)

१. शेतीमालाचे एकत्रीकरण:

सहकारी विपणन संस्था ज्या तालुका किंवा गावाच्या ठिकाणी कार्य करतात तेथे किंवा त्या ठिकाणी सभासदांनी उत्पादन केलेल्या मालाचे एकत्रीकरण करणे. सभासदांच्या शेतापासून संस्थेपर्यंत मालाची वाहतूक करणे. अशा प्रकारे सर्व सभासदांचा माल एकत्र करणे.

२. वर्गवारी व प्रतवारी :

शेतमालाचे वरीलप्रमाणे एकत्रीकरण केल्यानंतर त्याचा रंग, आकार, स्वाद, चव आणि इतर गुणधर्माच्या आधारे वर्गीकरण केले जाते. तसेच वस्तूंच्या अंगभूत गुणांनुसार निश्चित निकष ठरवून प्रतवारी केली जाते.

३. संग्रहण करणे :

शेतमालास मागणी येईपर्यंत त्याचा साठा व संरक्षण करावे लागते. तसेच त्यांचे गुणधर्म टिकवून ठेवावे लागतात. सहकारी विपणन संस्थेची स्वत:ची गुदामे असतात. त्यातून शेतमालाचा साठा केला जातो. संग्रहण कार्यामुळे काही शेतमाल अधिक काळ टिकवून ठेवल्यास त्याची प्रत वाढते व त्यास गली किंमत येते.

४. मालाची बांधणी :

संग्रहीत शेतमालाची हलवाहलव व वाहतूक करणे सोपे व्हावे यासाठी विशिष्ट आकार अगर वजनात बांधणी केली जाते. बांधणीमुळे कमी जागेत अधिक माल साठविता येतो.

५. वाहतूक करणे :

शेतमालाची गुदामातून बाजारपेठेपर्यंत वाहतूक करावी लागते. दूध उत्पादक संस्था दुधाची वाहतूक उपभोक्त्यांच्या ठिकाणापर्यंत करतात.. बऱ्याच वेळा विपणन संस्था शेतमालाची वाहतूक पुढील प्रक्रियांसाठी प्रक्रिया उद्योगाच्या जागेपर्यंत करतात.

६. प्रक्रिया करणे :

शेतमालावर प्रक्रिया केल्यास त्यास अधिक भाव मिळतो. प्रक्रियांमध्ये शेतमालापासून पदार्थ तयार केले जातात. उदा. शेंगापासून तेल काढणे; कापसाचे गठ्ठे तयार करणे; दुधापासून लोणी, तूप व इतर उत्पादन करणे इत्यादी.

७. विक्री व्यवस्था :

संग्रहीत अगर प्रक्रिया केलेल्या मालाच्या विक्रीची व्यवस्था विपणन संस्थेस करावी लागते. विपणन संस्था स्वतःच्या किंवा सहकारी विक्री केंद्रे अथवा ग्राहक भांडारामार्फत विक्रीची व्यवस्था करते.

८. कर्जपुरवठा :

सभासदांनी संस्थेकडे विक्रीसाठी सुपूर्द केलेल्या मालाच्या तारणावर विपणन संस्था अगर अर्थपुरवठा संस्थांच्या मदतीने कर्जपुरवठा करतात.

९. पतपुरवठा व विक्रीची सांगड :

शेतकरी सभासद ग्रामीण भागांतून सहकारी संस्थाकडून कर्जे घेतात. शेतकऱ्यांनी विपणन संस्थांकडे शेतमाल विक्रीसाठी दिल्यानंतर विक्री करून येणारी रक्कम सहकारी संस्थांकडे पाठविली जाते. पतपुरवठा संस्था सभासदांकडून कर्जाच्या येणे हस्याची रक्कम कापून बाकी रक्कम त्यास देते. अशा प्रकारे पतपुरवठा व विक्री यात सांगड घातली जाते.

१०. माहिती संकलन :

विपणन संस्था ही सभासदांसाठी माहितीचे भांडार म्हणून कार्य करते. यात बाजारपेठेतील मालाची आवक, विक्री, दर इत्यादींची माहिती गोळा करते. त्याच्या आधारे पुढील काळात कोणत्या शेतमालास अधिक मागणी असेल व अधिक भाव मिळेल त्यासंबंधी सभासदांना माहिती व मार्गदर्शन दिले जाते.

११. मालाची निर्यात :

शेतमालाची परदेशात निर्यात करणे, त्याद्वारे सभासदांच्या उत्पादनास अधिक किंमत मिळवून देणे.

१२. किमतीचे स्थिरीकरण:

बाजारपेठेत मागणीनुसार मालाचा पुरवठा करून मागणी व पुरवठ्यात समन्वय साधणे व त्याद्वारे शेतमालाच्या किमतीचे स्थिरीकरण करणे.

१३. वस्तूंचा पुरवठा :

सभासदांना बी-बियाणे, खते, जंतुनाशके व इतर अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे व उत्पादनवाढीस प्रोत्साहन देणे.

१४. धान्य वसुली कार्यात शासनास मदत :

शासनास धान्य वसुली कार्यात मदत करणे अगर शासनाच्या वतीने प्रतिनिधी म्हणून धान्य वसुली करणे.

सहकारी विपणन संस्थांचे प्रकार (Types)

१. एकल वस्तूचे विपणन करणाऱ्या सहकारी संस्था :

सदर संस्थांचे कार्य हे सदस्यांद्वारे निर्मित एकाच विशिष्ट वस्तू अथवा उत्पादनाच्या विपणनापुरते मर्यादित असते. अशा वस्तूंच्या विपणनात सदर संस्थांचे विशेष कौशल्य निर्माण झालेले असते. ऊस, कापूस, तेलबिया, गहू अशा कृषी क्षेत्राशी निगडित वस्तूंचे विपणन या प्रकारातील संस्थांद्वारे केले जाते.

२. बहु वस्तूंचे विपणन करणाऱ्या सहकारी संस्थाः

संस्था सदस्यांद्वारे निर्मित अथवा उत्पादित केल्या जाणाऱ्या अनेक प्रकारच्या वस्तूंचे विपणन बहु वस्तू विपणन संस्थांद्वारे केले जाते. शेतीमाल तसेच शेतमालावर प्रक्रिया करून निर्मित होणाऱ्या विविध वस्तूंचे विपणन या संस्थांद्वारे केले जाते. भारतात सहकारी विपणन क्षेत्रात येणाऱ्या बहुतांश संस्था या प्रकारात मोडतात.

३. बहुउद्देशीय व बहु वस्तूंचे विपणन करणाऱ्या सहकारी संस्था :

बहु वस्तूंचे विपणन करणाऱ्या संस्था प्रकाराचे हे एक व्यापक स्वरूप आहे. सदर प्रकारात बहुविध वस्तूंच्या विपणन कार्याबरोबरच अशा वस्तूंच्या निर्मिती अथवा निर्माण प्रक्रियेशी निगडित इतर आवश्यक अशा सेवा व सुविधांचाही पुरवठा या संस्थांद्वारे सदस्यांना केला जातो. उदाहरणार्थ, उत्पादन कार्यासाठी कच्च्या मालाचा पुरवठा, प्रशिक्षण व मार्गदर्शन, पतपुरवठा इत्यादी.

भारतातील सहकारी विपणन संस्थांच्या समस्या (Problems)

१. अपुरे भांडवल:

सहकारी विपणन संस्थांना खरेदी-विक्रीचे व्यवहार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते. तसेच शेतकऱ्यांना शेतमालावर उचल द्यावी लागत असल्याने हंगामात भांडवलाची अधिक गरज भासते. भागांच्या विक्रीद्वारे उभारलेले भांडवल अपुरे पडते. बँकांद्वारे या संस्थांना कर्जपुरवठा होत नाही.

२. पतपुरवठा संस्थांकडून स्पर्धा :

आधुनिक काळात पतपुरवठा संस्थांनी : शेतमालाच्या खरेदी-विक्रीच्या कार्यात भाग घेणे सुरू केल्याने आणि पतपुरवठा संस्थांशी शेतकऱ्यांचे घनिष्ठ संबंध असल्याने स्पर्धा निर्माण झाली आहे. ही स्पर्धा टाळणे अत्यंत आवश्यक आहे.

३. वाहतूक सोईत अडचणी:

शेतमालाच्या एकत्रीकरणासाठी त्या संस्थांकडे पुरेशी वाहतूक साधने नसल्यामुळे शेतमालाची वेळेवर वाहतूक करता येत नाही. या संस्थांनी स्वतःची स्वतंत्र वाहतूक व्यवस्था निर्माण करून किंवा सहकारी संस्थांशी संबंध प्रस्थापित करून ही अडचण सोडविणे आवश्यक आहे.

४. अनियोजित विकास

सहकारी विपणन संस्थांच्या विकासाची निश्चित अशी योजना शासनाने आखलेली नाही. संस्थेचे क्षेत्र, आकार, व्यवहार याबाबत मार्गदर्शक सूत्रे निश्चित नाहीत. तसेच पतपुरवठा संस्था आणि विपणन संस्थांच्या संलग्नतेबाबतही निश्चित धोरण ठरलेले नाही.

५. एकात्मतेचा अभाव :

प्राथमिक सहकारी विपणन संस्था व राज्य सहकारी विपणन संस्था यांच्यातील कार्यात व धोरणात एकसूत्रतेचा अभाव आढळतो. त्यामुळे सहकारी विपणन संस्थांच्या विकासाची दिशा निश्चित होत नाही.

६. पतपुरवठा संस्थांशी नाममात्र संबंध:

सहकारी विपणन संस्था व पतपुरवठा संस्था यांच्यात असणारे संबंध हे नाममात्र आहेत. पतपुरवठा संस्था शेतमालाच्या खरेदी-विक्री कार्यात आता सहभागी होत असल्यामुळे विपणन संस्था व पतपुरवठा संस्थांत समन्वय प्रस्थापित होण्यात अडचणी येत आहेत.

७. अकार्यक्षम व्यवस्थापन :

भांडवलाअभावी तज्ज्ञ व प्रशिक्षित सेवकवर्ग संस्था नेमू शकत नाही. त्यामुळे व्यवस्थापनात अकार्यक्षमता निर्माण झाली आहे. तसेच राजकीय गटांच्या अस्तित्वामुळे अकार्यक्षमता वाढीस लागली आहे.

८. प्रक्रिया सोईचा अभाव :

सहकारी विपणन संस्था विविध प्रकारच्या कृषी उत्पादनासाठी स्थापन झाल्या आहेत. त्यांना पुरेशा प्रमाणात प्रक्रिया सोई उपलब्ध नाहीत. याचा विपरीत परिणाम विपणन कार्यावर होत आहे.

९. हिशेबतपासणीचा अभाव :

संस्थांच्या हिशेबतपासणीचे काम वेळेवर होत नसल्याने गैरप्रकार व गैरव्यवहारांना उत्तेजन मिळते.

१०. शासकीय धोरणातील अनिश्चितता:

सहकारी विपणन संस्थांबाबतचे शासकीय धोरण निश्चित नाही. शासनाच्या धोरणात्मक धरसोड वृत्तीमुळे संस्थांना आपले कार्य परिणामकारकपणे पार पाडता येत नाही.

उपाययोजना (Remedies to Problems)

१. भांडवल व निधीत वाढ :

सहकारी विपणन संस्थांना आपल्या व्यवहारात वाढ करावयाची असेल तर त्यांनी आर्थिक सुदृढता प्राप्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी या संस्थांनी आपले भागभांडवल वाढविण्याचा प्रयत्न करावा. तसेच नफ्याचा काही भाग राखीव निधीस दरवर्षी वर्ग करावा. या संस्थांनी आपली सभासद संख्या वाढविली पाहिजे. या संस्थांनी सभासदांना संस्थेकडे ठेवी ठेवण्यासाठी प्रवृत्त करावे. शासनाने या संस्था सक्षम होण्याच्या दृष्टीने सहकारी विपणन संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करावी.

२. हुंडी पद्धती व तारण कर्ज :

या संस्था सरकारचे प्रतिनिधी म्हणून बाजारपेठात कार्य करीत असतील तर त्यासाठी हुंडी पद्धतीचा वापर करण्यास मान्यता आणि शेतमालावर तारण कर्ज यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात यावी.

३. विपणन संस्थांनी प्राथमिक पतसंस्थांना सदस्यत्व देणे :

प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांनी सहकारी विपणन संस्थांचे सभासदत्व स्वीकारावे आणि सहकारी विपणन संस्थांनी त्यांना सभासदत्व द्यावे. त्यामुळे विपणन संस्थांना मदत होईल.

४. उधारीवरील व्यवहार कमी करणे :

विपणन सहकारी संस्थांनी पतीवर किंवा उधारीवर व्यवहार हळूहळू कमी करावेत. यासाठी स्टेट बँक आणि व्यापारी बँकांनी विपणन सहकारी संस्थांना कर्जपुरवठा करावा.

५. सावकार व व्यापाऱ्यांचे उच्चाटन :

विपणन सहकारी संस्थांनी आपल्या व्यवसायाच्या प्रक्रियेत सावकार आणि व्यापाऱ्यांना कोणतेही स्थान देऊ नये.

६. लायक कर्मचाऱ्यांची नेमणूक :

संस्थेत लायक आणि कार्यक्षम कर्मचारी वर्ग आकर्षित व्हावा यासाठी विपणन संस्थांनी आपल्या व्यवस्थापकीय रचनेत आवश्यक ते बदल करावेत.

७. प्रशिक्षण व्यवस्था:

संस्थेतील अप्रशिक्षित किंवा कमी प्रशिक्षित व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यासाठीची व्यवस्था करावी. विपणन संस्थांतून व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांची भरती केल्यानंतर त्यांना प्रशिक्षण देण्यासाठीच्या सोई राज्य सरकारने पुरवाव्यात.

८. भांडवल उभारणी :

प्राथमिक सहकारी विपणन संस्थांचे कामकाज पद्धतशीरपणे चालविण्यासाठी संस्थेस २ लक्ष रुपये भांडवलाची गरज असते.. त्यासाठी या संस्थांनी अधिक सभासदांची नोंदणी करून भांडवल वाढविण्याचा प्रयत्न करावा.

९. बँकेद्वारे अग्रक्रमाने मदत:

सहकारी विपणन संस्थांना त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने बँकिंग संस्थांनी अग्रक्रम द्यावा. त्यामुळे अशा संस्थांच्या व्यवहाराचे प्रमाण वाढण्यास उला वाढ होण्यास मदत होईल.

१०. वर्गीकरण व बांधणीनंतर विक्री:

विपणन संस्थांनी सभासदांनी विक्रीसाठी आणलेल्या मालावर वर्गीकरण आणि बांधणी या प्रक्रिया पूर्ण करून नंतर त्याची विक्री करावी.

११. ग्राहक आणि उत्पादक संस्थांत सहकार्य :

ग्राहक संस्था आणि उत्पादकांच्या संस्था यांनी विपणन संस्थांशी संबंध प्रस्थापित करावेत. त्यामुळे तिन्ही संस्थांचे हितसंबंध राखण्यास मदत होईल.

१२. गुदाम व्यवस्था :

विपणन संस्थांनी स्वतःची संग्रहण व्यवस्था करावी त्यासाठी सरकारकडून आर्थिक मदत प्राप्त करून स्वतःची गुदामे बांधावीत.

राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड)

(National Agricultural Co-operative Marketing Federation)

प्रास्ताविक

राज्य आणि केंद्र सरकारने कृषी उत्पादन विपणन कार्यास बळकटी येण्यासाठी आणि मध्यस्थांचे उच्चाटन करण्यासाठी आवश्यक कायदे केले. याच प्रयत्नांना बळकटी यावी यासाठी राष्ट्रीय पातळीवर 'राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ म्हणजे नाफेड' ही संस्था स्थापन करण्यात आली. त्यामुळे तालुका खरेदी विक्री संघ, जिल्हा खरेदी-विक्री संघ, राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ इत्यादी संस्थांच्या कार्यांना बळकटी आणि दिशा प्राप्त होण्यास मदत झाली.

भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड)

(National Agricultural Co-operative Marketing Federation (NAFED) Management and Structure)

व्यवस्थापन व संरचना

कृषी मालाच्या खरेदी-विक्री किंवा विपणन कार्यात बळकटी यावी आणि देशात स्थानिक पातळीपासून राज्य पातळीपर्यंत कार्य करणाऱ्या विपणन संघांना नेतृत्व लाभावे या दृष्टीने १९५८ मध्ये भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ या संस्थेची स्थापना करण्यात आली. नाफेडचे प्रमुख कार्यालय दिल्ली इथे असून कामाच्या सोईसाठी देशात पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण अशा विभागांनुसार एकूण १८ विभागीय शाखा कार्यालये व ६ उपविभागीय कार्यालये कार्यरत आहेत.

सद्यःस्थितीत नाफेड ही एक बहुराज्य सहकारी संस्था कायदा २००२ नुसार नोंदणीकृत संस्था म्हणून कार्य करीत असून भारत सरकारचे या संस्थेत कोणतेही भागभांडवल गुंतविण्यात आलेले नाही.

सभासदत्व :

नाफेड ही राष्ट्रीय स्तरावर कार्य करणारी संघीय संस्था आहे. त्यामुळे राज्य कृषी सहकारी विपणन संघ नाफेडचे सभासद असतात. त्याशिवाय राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर कार्य करणाऱ्या अन्य कृषिमाल विपणन संस्थांना सभासदत्व दिले जाते. तसेच कृषिमाल प्रक्रिया संस्थांना नाफेडचे सभासदत्व होता येते. सभासद करून घेण्याबाबत नाफेडने व्यापक दृष्टिकोण स्वीकारल्यामुळे देशातील स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत कार्य करणाऱ्या संस्थांच्या विपणन कार्यात आणि विपणन कार्यात सुसूत्रता आणणे देशात आणि विदेशातही शक्य झाले आहे.

३१ मार्च, २०१८ च्या आकडेवारीनुसार नाफेडच्या सभासद संस्थांची संख्या पुढीलप्रमाणे -

क्र.	सभासद वर्ग	सभासद संख्या
१.	शिखर स्तरावरील विपणन संघ	०३
२.	राज्य सहकारी विपणन संघ	२५
३.	राज्यस्तरीय जनजाती तथा जिन्नस महासंघ	२४
४.	प्राथमिक विपणन / प्रक्रिया संस्था	८०४
५.	राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघ आणि इतर राष्ट्रीय स्तरीय सहकारी संस्था	०२

भांडवल :

नाफेड या संस्थेच्या स्थापना कार्यात केंद्र सरकार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि स्टेट बँक ऑफ इंडिया आणि राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ यांनी सहभाग घेतला होता. या संस्थांनी ६० लाख रुपयांचे भांडवल पुरवले होते. राज्य सहकारी विपणन संघ, केंद्रीय विपणन संघ आणि अन्य विपणन तसेच प्रक्रिया संस्था या नाफेडच्या सभासद असून त्यांनीही भागभांडवल पुरविले आहे. सद्यःस्थितीत नाफेडचे अधिकृत भागभांडवल १०० कोटी रुपये इतके असून त्यामध्ये भारत सरकारचा कोणताही भाग नाही. सन २०१८-१९ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार सभासद माध्यमातून निर्मित असे २५४०.९१ लक्ष रुपये भांडवल नाफेडकडे होते.

व्यवस्थापन :

नाफेडचे व्यवस्थापन संचालक मंडळाकडून केले जाते. ज्यामध्ये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा समावेश असतो. सदर व्यवस्थापकीय मंडळाची संख्या २१ इतकी निश्चित असून सदर मंडळाला दोन स्थायी समिती, कार्यकारी समिती आणि व्यवसाय समिती यांच्याद्वारे मदत केली जाते. याशिवाय गरज पडल्यास बहुराज्य सहकारी संस्था कायद्याच्या तरतुदीनुसार तसेच नाफेडच्या पोटनियमानुसार व्यवस्थापन आणखी दोन समित्या / उपसमित्या स्थापन करू शकते.

राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघाचे उद्देश

(Objectives of Nafed)

१. सहकारी तत्त्वावर कृषी उत्पादनाच्या विपणन कार्यास प्रोत्साहन देणे.

२. कृषिमाल उत्पादकांची सौदाशक्ती बळकट करणे.

३. राज्य सहकारी खरेदी-विक्री संस्थांना विपणन कार्यात मदत करणे.

४. संस्था सभासदांना कृषी इत्यादींबाबत माहिती पुरविणे, बाजारपेठा, कृषी उत्पादने, किंमतपातळी, मागणी

५. देशातील विपणन संस्थांच्या खरेदी-विक्री कार्यात समन्वय साधणे आणि देशातील कृषी उत्पादनाबाबतच्या मागण्या पूर्ण करणे.

६. कृषी उत्पादनांचा दर्जा वाढावा यासाठी आधुनिक ज्ञान आणि तंत्रांची माहिती संस्थामार्फत उत्पादकापर्यंत पोहोचविणे,

७. कृषी उत्पादनवाढीसाठी सुधारित बी-बियाणे, खते, जंतुनाशके इत्यादी कृषी उत्पादकापर्यंत पोहोचविणे तसेच आधुनिक उत्पादन तंत्र आणि सुधारित उत्पादन पद्धतीची माहिती पुरविणे.

८. सहकारी विपणन संस्थांना कृषी साहित्य आणि शेतीकामासाठीची यंत्रसामग्री पुरविणे किंवा उपलब्ध करून देणे.

९. नाशवंत उत्पादनाच्या संग्रहणासाठी शीतगृहाची व्यवस्था करणे.

१०. आवश्यक असेल तेव्हा देशात कमी उत्पादन असलेल्या कृषी उत्पादनाची आयात करणे आणि पुरवठा करणे तसेच देशातून अतिरिक्त उत्पादित कृषिमालाची निर्यात करणे.

११. धान्य वसुली कार्यात शासनास मदत करणे.

१२. शेतमालाच्या किंमतविषयक धोरणाची अंमलबजावणी करणे.

भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघाची कार्ये

(Functions of Nafed)

(अ) कृषी फलोद्योग व वन उत्पादनांच्या प्रक्रिया, साठवणूक आणि विपणनास प्रोत्साहन देणे व विकास यामध्ये खालील गोष्टी व प्रक्रियांचा समावेश होतो.

१. कृषी व निगडित उत्पादनांच्या विपणन व व्यापाराशी संबंधित सहकारी संस्थांना मदत, प्रोत्साहन व मार्गदर्शन देणे.

२. गुदामाशी निगडित अधिनियमानुसारी स्वतःची गुदामे व शीतगृहे बांधणे.

३. कृषी वा शेतीमालाच्या साठवणुकीसाठी भारतीय अथवा परकीय प्रतिनिधी संस्थांशी सहकार्याने साठवणूक गृहे बांधणे.

४. विपणन, प्रक्रिया व वितरण व्यवस्थेशी निगडित सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाची सुविधा पुरविणे.

५. शेतकी, फलोद्योग, वनोद्योग तसेच लोकर इत्यादींशी निगडित उत्पादनांसाठी प्रक्रिया उद्योगांची उभारणी करणे.

६. शेतकी वा कृषी उत्पादनांचे दर्जानुसार वर्गीकरण, बांधणी व प्रमाणीकरण करणे.

(ब) वित्त व पतपुरवठा

१. नाफेडच्या उद्देशांनुसार कार्य करणाऱ्या कोणत्याही क्षेत्रातील सहकारी संस्थांना भागभांडवल पुरवठा करणे.

२. नाफेडच्या व्यवसाय व उद्देशानुरूप गरज असणारी जमीन, इमारत, वाहने इत्यादी विकत अथवा भाडेतत्त्वावर घेणे किंवा देणे.

३. नाफेडच्या सदस्य असणाऱ्या व्यक्ती अथवा सहकारी संस्थांना वस्तू अथवा मालाच्या आधारावर कर्जपुरवठा करणे.

(क) शेतीशी निगडित यंत्रे, वाहने व अवजारांचे वितरण

१. शेती, फळ, वन व प्राणिज उत्पादनांशी निगडित सर्व प्रकारच्या वस्तूंची खरेदी विक्री आणि पुरवठा,

२. उत्पादनांशी निगडित यंत्रसामग्रीची निर्मिती तसेच यंत्रसामग्रीच्या देखरेखीसाठी आवश्यक सुटे भाग व घटकांची निर्मिती व उत्पादन.

३. उत्पादनांच्या वाहतुकीसाठी स्वतःची वाहतूक यंत्रणा कार्यरत ठेवणे. भारत व भारताबाहेरील वाहतुकीसाठी नाफेड इतर संस्थांच्या सहकार्यानेही काम करते.

(ड) निगडित उत्पादनांच्या राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रत्यक्ष सहभाग व प्रोत्साहन

भारत सरकारच्या एखाद्या योजनेखाली स्वतःहून किंवा नाफेडशी संलग्न कोणत्याही इतर संस्थेद्वारे नाफेड कृषी, फल, वन व प्राणिज उत्पादनांच्या राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यापारात सहभाग घेते किंवा यासाठी इतर संस्थांना प्रोत्साहन व मदत देते. या उद्देशपूर्तीसाठी नाफेड देशात किंवा देशाबाहेर स्वतःच्या शाखा उघडू शकते तसेच प्रतिनिधी नेमू शकते.

(इ) कृषी निगडित तांत्रिक सल्ला पुरवठा

१. सहकारी संस्था व संस्था सदस्यांसाठी सल्ला व मार्गदर्शन पुरवठा कार्याचे संचलन नाफेड करते. व प्रगतीसाठी

२. सहकारी विपणन, प्रक्रिया व निगडित संस्थांच्या विकास आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थांशी संगनमत व करार करणे.

३. विपणन, प्रक्रिया व वितरण क्षेत्रातील सहकारी संस्थांना व्यवस्थापकीय व तांत्रिक सल्ला पुरविण्यासाठी तज्ज्ञ लोकांची संघटना गठीत करणे.

४. विपणन व तंत्र सल्लाविषयक संशोधन प्रकल्प राबविणे

(फ) प्रतिनिधी रूपातील कार्य करणे या उद्देशात पुढील गोष्टींचा समावेश होतो.

१. निगडित उत्पादनांच्या खरेदी-विक्री, साठवणूक व वितरण कार्यासाठी शासनाचा अथवा सहकारी संस्थांचा प्रतिनिधी म्हणून कार्य करणे.

२. विमा प्रतिनिधी म्हणून कार्य करणे.

३. आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थांशी सहकार्य करार करताना देशाचा प्रतिनिधी म्हणून भूमिका पार पाडणे.

नाफेडची प्रगती (Progress of Nafed)

(अ) भागभांडवल आणि स्वनिधीची परिस्थिती

(अ) भागभांडवल ...

निर्देशक	२०१४-१५	२०१५-१६	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९
भागभांडवल	२४०६.४८	२४१७.७१	२४२८.११	२४६७.१८	२५४०.९९
एकूण	२४०६.४८	२४१७.७१	२४२८.११	२४६७.१८	२५४०.९९
राखीव व इतर निधी	(-)३४४७३.१६	(-)५०५५४.६१	(-)६५७७१.५३	(-)७०२३०.२४	(-)४७९१२.३२
निव्वळ नफा/तोटा	(-)१५६६७.५७	(-)१४८०६.६८	(-)४०७४.७४	२२६८१.४०	२७९३१.३८
एकूण स्वनिधी	(-)४७७३४.२५	(-)६२९४३.५८	(-)६७४१८.१६	(-)४५०८१.६५	(-)१७४४०.०३

(स्रोत : नाफेड वार्षिक अहवाल २०१८-१९ आकडे रु. लाखात)

नाफेडकडील स्वनिधी हे नकारात्मक आकडेवारीत असून २०१६-१७ नंतर या परिस्थितीत सुधारणा होत असून २०१७-१८ मध्ये व २०१८-१९ मध्ये नाफेडने निव्वळ नफा मिळविलेला दिसत असून त्याच्या उपयोग परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी झालेला दिसतो आहे.

(ब) व्यवसाय उलाढाल

(ब) व्यवसाय उलाढाल

निर्देशक	२०१४-१५	२०१५-१६	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९
(A) अंतर्गत व्यापार नाबार्ड अंतर्गत खाते	५९५४.८०	१७१२३.१०	२४०७८.८३	१५३४३३.३१	३२२८२५.४१
कृषिमाल	--	--	--	--	--
औद्योगिक संस्था	८८६.५१	२६७२.७२	३४९६.७४	४२४८.७०	--
भारत सरकारच्या खात्यावरील विक्री	२४४७४१.८४	३३८२२.४५	२२९०१.१४	१६३५८५.६४	१६८८२००.११
एकूण	२५१५८३.१५	५४४१८.२७	५०४७६.७१	३२१२६७.६५	२०११०२६.४१
(B) परकीय व्यापार नाबार्डद्वारे निर्यात	५४.६६	--	--	--	२८११.२१
एकूण	५४.६६	--	--	--	२८११.२१
एकूण व्यापार व व्यवसाय उलाढाल	२५१६३७.८१	५४४१८.२७	५०४७६.७१	३२१२६७.६५	२०१३८४५.७१

(स्रोत : नाफेड वार्षिक अहवाल २०१८-१९ आकडे रु. लाखात)

एकूण व्यापार व व्यवसाय उलाढालीचा विचार करता सन २०१८-१९ हे उच्चतर उलाढालीचे वर्ष ठरले असून त्याच्याशी तुलना करता त्या आधीच्या वर्षांतील व्यवसाय उलाढालीची कामगिरी ही दुबळी दिसत आहे.

(क) एकूण घरगुती (देशांतर्गत) व्यापार

(क) एकूण घरगुती (देशांतर्गत) व्यापार

उत्पादन	२०१४–१५	२०१५–१६	२०१६–१७	२०१७–१८	२०१८–१९
खाद्यान्न	२०८६.२३	१५०२८.९१	१५३९२.०७	३१०८९.४६	५५१२३.०८
डाळी	१०६४५४.३४	२७४७९.३६	२०५२८.७६	२४०५११.५८	१२६८७३२.३३
तेलबिया व तेल	१३१२९४.२०	५९३३.५२	२६३१.३१	३४६७३.९१	६६०२२२.९४
मसाले	५४२.३३	४९९.४०	३७२.२९	२६६.६६	४३२.१०
फळे व भाज्या	६१६.६०	६३७.४४	१०१४.१७	२३५९.५३	१८३६.६४
कापूस	७२११.०१	–	–	–	–
ज्यूट	२२.५३	११०.४५	७.३१	७१२.८२	३०११.४१
पोल्ट्री	२०५.७४	२०५.११	२२५.५३	२३१.२३	२५०.०३
खते	१३६७.८०	१२२.६३	१२७.९८	–	–
बिया	८१७.८२	–	३२३७.२८	७७४.१७	७१६.४१
अन्य उत्पादने	८९५.८६	१७२८.७३	६८०७.६५	६३१८.७१	२३५२१.८७
कृषिमाल	–	–	–	–	–
औद्योगिक संस्था	६८.६१	२६७२.७२	१३१.४८	४२४८.७०	–
एकूण आंतरिक व्यापार	२५१५८३.१५	५४४१८.२७	५०४७६.७१	३२१२६७.६५	२०१३८४६.९७

वरील आकडेवारीचा विचार करता घरगुती व्यापाराच्या बाबतीत सन २०१६ १७ नंतर नाफेडने भरीव कामगिरी केलेली दिसून येत असून त्यानंतर यातील नाफेडच्या प्रगतीचा आलेख सर्व उत्पादनांबाबतीत चढता राहिलेला दिसतो आहे.

सहकारी शेती (Co-operative Farming)

प्रास्ताविक

सहकारी शेती म्हणजे शेतकरी वर्गाने स्वेच्छेने आपल्या जमिनीचा मालकी हक्क अबाधित ठेवून ती कसण्यासाठी एकत्र आणणे आणि कृषीविषयक सर्व कार्य सामूहिकपणे पार पाडून येणाऱ्या उत्पादनातून खर्च वजा जाता बाकी आधिक्याचे वाटप सभासदांत करणे हे होय. आधिक्याचे वाटप करण्यापूर्वी काही रक्कम ही निधीला वर्ग केली जाते, की ज्यांचा वापर अडीअडचणीच्या काळात केला जातो. सहकारी शेतीसाठी काही वेळेस जमीनदारांकडून किंवा शासनाकडून भाडेपट्टीने जमीन मिळविली जाते. बऱ्याच वेळा भूमिहीन मजूर व ग्रामीण भागातील बेकार व्यक्तींना सरकार या पद्धतीने जमीन कसावयास देते.

सहकारी शेती : व्याख्या

(Co-operative Farming : Definition)

शेतकरी परिषदेने केलेल्या व्याख्येनुसार "शेतकरी किंवा शेतजमिनीचे मालक आपल्या जमिनीचा उपयोग करण्याचा अधिकार संघटनेच्या स्वाधीन करून सर्व कृषी कार्ये सामूहिक पद्धतीने पार पाडतात तेव्हा त्यास सहकारी शेती असे म्हणतात.‘

सहकारी शेती अभ्यासगटाच्या मताप्रमाणे "शेतजमिनी एकत्र करून उपलब्ध मानवी शक्ती व कृषी साधनांचा पुरेपूर उपयोग करून कृषी उत्पादन, रोजगार आणि प्राप्तीत वाढ करण्याच्या उद्देशाने ज्यात सर्व सभासद स्वेच्छेने सहभागी होतात अशा संस्थेस सहकारी शेती संस्था म्हणतात."

सहकारी शेतीचे प्रकार

(Types of Co-operative Farming)

१. सहकारी सुधार शेती (Co-operative Better Farming) :

शेतीत सुधारणा करणे व कृषी उत्पादनात वाढ करणे हा या सहकारी संस्थेचा उद्देश असतो. सभासद पल्या जमिनी एकत्र आणत नाहीत अगर सामूहिकपणे कसतही नाहीत. सभासद एकत्र येऊन फक्त शेती विकासाच्या योजना आखतात. संस्थेद्वारे पेरणी, खतांचा वापर, बी-बियाणांचा वापर, यांत्रिक अवजारांचा वापर यांविषयी मार्गदर्शन मिळते. संस्थेने ठरवून दिलेल्या योजनेनुसार सभासद लागवड करतात. संस्था सभासदांना ज्या सेवा अगर सुविधा पुरविते त्याबद्दल मोबदला आकारला जातो.

२. सहकारी संयुक्त शेती (Co-operative Joint Farming)

संयुक्त सहकारी शेतीत लहान भूधारक एकत्र येतात. जमिनीवरील आपला मालकी हक्क अबाधित ठेवून जमीन कसण्यासाठी संस्थेकडे हस्तांतरित केली जाते. अशा अनेक लहान शेतकऱ्यांकडून जमिनी एकत्र करून त्यावर सहकारी पद्धतीने शेती केली जाते. सहकारी संस्था शेतीसाठीची योजना तयार करते. त्या योजनेनुसार सभासदांना लागवडीपासून मळणीपर्यंतची सर्व कामे करावी लागतात. सभासदांना शेतीत केलेल्या कामाबद्दल मजुरी दिली जाते. शेतीतून येणारे उत्पादन संस्थेच्या मालकीचे असते. त्यातूनच खर्च वजा जाता, सभासदांना त्यांच्या जमिनीसाठी, आकारानुसार खंड दिला जातो. तसेच आधिक्यातून लाभांश दिला जातो. या प्रकारात सभासदांचा जमिनीवरील मालकी हक्क कायम राहतो. तसेच उत्पादन वाढीचे फायदे सभासदांस मिळू शकतात.

३. कूळ सहकारी संस्था (Tenant Co-operative Farming)

स्वतःची जमीन नाही; परंतु जमीन कसण्याची व शेती करण्याची इच्छा आहे अशा भूमिहीन मजुरांनी स्थापलेली ही संस्था होय. शासन किंवा जमीनदारांकडून अतिरिक्त जमीन भाडेपट्टीने ही संस्था मिळविते. जमिनीचे तुकडे हे कसण्यासाठी सभासदांना ठरवून दिले जातात. संस्था शेतीची योजना तयार करते. त्यामध्ये कोणते पीक घ्यावे, लागवड पद्धती, बी-बियाणे व खतांचा वापर इत्यादींचा समावेश असतो. संस्थेमार्फत सभासदांना खते, बी-बियाणे व शेतीची अवजारे उपलब्ध करून दिली जातात. त्याबद्दल आकार संस्थेकडे भरावा लागतो. तसेच येणाऱ्या उत्पादनातून सभासदांना संस्थेने ठरवून दिलेला खंड भरावा लागतो. शेतीतून येणाऱ्या उत्पादनाचा सभासद मालक असतो. जमिनीचा मूळ मालक, जमीनदार किंवा संस्था शासनास खंड देते. संस्थेस नफा झाल्यास राखीव निधीकडे काही रक्कम वर्ग करता बाकी रक्कम सभासदांस लाभांशरूपाने वाटली जाते. या प्रकारामुळे भूमिहीन व बेरोजगारांना रोजगार मिळतो.

४. सामुदायिक सहकारी शेती (Co-operative Collective Farming) :

यात जमिनीची मालकी ही सामुदायिक असते. म्हणजे शासन जमिनीचा मालक असते. जमिनीचे लहान तुकडे एकत्र केले जातात व शेतकऱ्यांची सामुदायिक शेती संस्था स्थापली जाते. जमिनीची देखभाल व लागवड संस्थेमार्फत केली जाते. सभासदांना स्वतंत्रपणे कसण्यासाठी जमीन दिली जात नाही. सभासदांना जमिनीवर संस्था सांगेल त्याप्रमाणे काम करावे लागते. त्याबद्दल त्यांना ठरावीक दराने वेतन दिले जाते. सामुदायिक शेती संस्था शेतीच्या योजना तयार करावे व सभासदांच्या साहाय्याने त्याची अंमलबजावणी केली जाते. शेतीच्या कार्यासाठी यंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. संस्थेद्वारेच कृषी उत्पादनाची विक्री केली जाते. वर्षाअखेरीस खर्च वजा जाता राहिलेल्या आधिक्याचे वाटप सभासदांत त्यांच्या मजुरीच्या प्रमाणात केले जाते.

सहकारी शेतीबाबत समस्या

(Problems of Co-operative Farming)

१. सभासदाला व्यक्तिगत स्वातंत्र्य गमवावे लागते:

सहकारी शेती संस्थांत एकत्र येणाऱ्या सभासदांना जमिनीच्या उपयोगाविषयी संस्थेच्या निर्णयावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे शेती बाबतीत त्यांचे व्यक्तिगत स्वातंत्र्य संपते. त्यामुळे सहकारी शेतीसाठी हवे तेवढे सहकार्य मिळविण्यात अडचण येते.

२. वैयक्तिक कष्टानुसार मोबदला मिळत नाही

सभासदास व्यक्तिगतपणे जमिनीसाठी कष्ट घेऊन जो लाभ मिळविता येतो तसा लाभ सहकारी शेतीत मिळत नाही. कारण सहकारी शेतीतून निर्माण होणाऱ्या उत्पादनातील वाटा सर्व सभासदांना मिळतो. त्यामुळे सभासदांत उपक्रमशीलता आणि जबाबदारीची वृत्ती पुरेशा प्रमाणात जोपासली जात नाही.

३. जमिनीचे हस्तांतर अगर विक्रीवर मर्यादा :

सहकारी शेती संस्थेकडे जमिनी एकत्र आणल्यानंतर सभासदांच्या जमिनीचे हस्तांतर करण्यावर किंवा विक्री करण्याच्या हक्कांवर मर्यादा पडते. कारण सहकारी शेतीमध्ये ज्या कालावधीसाठी जमिनी एकत्र आणल्या जातात तो कालावधी संपेपर्यंत जमिनी इतरांच्या नावावर करता येत नाहीत अगर विकता येत नाहीत.

४. प्रोत्साहनाचा अभाव :

कौटुंबिक शेतीत जमीनमालक व त्याच्या कुटुंबातील व्यक्तींना उत्पादन वाढीचा लाभ मिळत असल्याने अधिक उत्पादनासाठी प्रोत्साहन मिळते तसे प्रोत्साहन सहकारी शेतीत मिळत नाही. कारण उत्पादन वाढीसाठी प्रयत्न केले तरी त्याचा सर्व सभासदांना लाभ मिळतो.

५. श्रमावर मर्यादा

सहकारी शेतीत सभासद हा फक्त एकट्यासाठी प्रयत्न न करता सर्वांसाठी प्रयत्न करतो. तसेच सर्वच सभासद सारख्या प्रमाणात सहकारी शेतीसाठी श्रम करतील असे नाही. आपल्या श्रमाचा इतरांना लाभ होत असल्याची जाणीव झाल्यास व्यक्तीच्या अधिक करण्याच्या कुवतीवर मानसिक मर्यादा पडतात. त्यामुळे सहकारी शेतीत म्हणाव्या तेवढ्या प्रमाणात उत्पादनात वाढ होत नाही,

६. सहकारी शेतीबाबत प्रतिकूलता:

ग्रामीण भारतात शेतकऱ्यांची जमीन कितीही लहान, मोठ्या आकाराची असली तरी ते जमिनीवरील हक्क आणि जमीन कसण्यातील आनंद सोडू इच्छित नाहीत. जमिनीतील लागवड फारशी फायद्याची नसली तरी शेतकरी जमीन कसत राहतात. त्याच्या मतात आणि विचारात बदल करणे अवघड ठरते.

७. जमिनीचे हेवेदावे :

ग्रामीण भागात जमिनीच्या वाटण्या, जमीन कसण्याच हक्क आणि वहिवाट यांबाबत बरेच वाद असतात. अशा जमिनीचे प्रमाणही मोठे असते. त्यामुळे सहकारी शेतीच्या प्रयोगात अडचणी येतात.

८. अविश्वास :

सहकारी शेती आणि तिचे फायदे यावर शेतकऱ्यांचा विश्वास बसत नाही. त्यामुळे सहकारी शेतीचा विकास करणे अडचणीचे बनते

सहकारी शेतीबाबत - उपाययोजना

(Remedies to Problems)

१. स्थानिक नेते आणि सामाजिक पुढाऱ्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सहकार शेतीच्या प्रयोगाचे लाभ पटवून देणे आणि त्यांना सहकारी शेतीत सहभागी होण्यास प्रोत्साहन देणे.

२. सहकारी शेतीबाबत येणाऱ्या कायदेशीर अडचणी तसेच दावे इत्यादींची योग्य प्रकारे निर्मूलन अथवा सोडवणूक करण्यात मदत करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा गठीत करणे.

३. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची मालकी अबाधित राहील याबाबत खात्री देणे.

४. सहकारी शेती संस्थांनी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवर वर्षाला विशिष्ट किमान उत्पन्न अथवा मोबदला देण्याची खात्री देणे.

५. सहकारी शेतीसाठी शेतकऱ्यांना शिक्षण, प्रशिक्षण देणे, शेतीची नवीन तंत्रे, पद्धती, सुधारित बियाणे, खते आणि अन्य बाबींसंबंधीचे तंत्र समजावून देणे.

६. शेती उत्पन्नाचे विपणन त्यासाठी एकत्रीकरण, प्रमाणीकरण, बांधणी इत्यादींबाबतचे तंत्र शिकविणे, बाजारपेठ यंत्रणा, बाजारपेठेचा कालावधी, किंमतप्राप्ती इत्यादींबाबतच्या प्रस्थापित घटकांचे ज्ञान देणे.

७. सहकारी शेतीवर, सभासदांना निवास, मुलांचे शिक्षण, वैद्यकीय सोई, करमणूक इ. सुविधा पुरविणे.

दुग्ध सहकारी संस्था

सहकारी तत्त्वावर दुग्ध व्यवसाय चालविण्याच्या संकल्पनेचा उदय स्वित्झर्लंडमध्ये सन १८१५ मध्ये झाला व त्यानंतर सदर संकल्पनेचा प्रसार युरोप व अमेरिका इत्यादी ठिकाणी झाला. भारतात सहकारी तत्त्वावरील पहिली दुग्ध सन १९१३ मध्ये अलाहाबाद, उत्तर प्रदेश इथे नोंदणीकृत झाली. दुसऱ्या संस्था महायुद्धादरम्यान दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या सैन्याकडून वाढलेल्या मागणीमुळे तसेच जागतिक शहरी भागामध्ये दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या उपलब्धतेबाबत निर्माण झालेल्या टंचाईमुळे सहकारी तत्त्वावरील दुग्ध संस्थांच्या निर्मिती अथवा स्थापनेला मोठी चालना मिळाली.

सहकारी दूध संस्थांची ग्रामीण विकासातील भूमिका

(Role of Dairy Co-operative in Rural Development)

१. शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक :

सहकारी दूध संस्थांनी देशाच्या ग्रामीण अर्थकारणात आमूलाग्र बदल घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ग्रामीण भागात दूध क्रांती घडविणाऱ्या दूध संस्थांनी शेतकऱ्यांच्या हिताकडे लक्ष दे सुरू केले आणि त्या त्यात यशस्वी झाल्या आहेत. दूध सस्थामुळे शेतकऱ्यांना शेतीच्या जोडीला दुसरा धंदा मिळाला. त्याचबरोबर दूध उत्पादनाचे मूल्य ताबडतोब मिळू लागले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आणि दूध उत्पादकांच्या आर्थिक स्थितीत बदल झाला.

२. स्वयंरोजगारात वाढ :

दूध संस्थांच्या विकासामुळे ग्रामीण भागातील बेकार युवक आणि भूमिहीन मजुरांना एक नवीन संधी लाभली. त्यातून त्यांना कायमचा रोजगार मिळाला. तसेच त्यांच्या प्राप्तीच्या प्रमाणातही वाढ झाली. त्यातून त्यांना चांगले जीवन जगण्याची संधी लाभली आहे.

३. ग्रामीण उद्योग आणि उपक्रमांचा विकास :

दूध संस्थांचा विकास, जनावरांची वाढती संख्या यामुळे पशुखाद्य, पशुचिकित्सा, दूध वाहतूक आणि दुधाच्या विविध पदार्थांची विक्री केंद्रे इत्यादींचा ग्रामीण भागात आणि शहरी भागात विकास झाला. ग्रामीण भागात जनावरांच्या पैदाशीचे प्रमाण वाढले. दुष्काळी आणि कमी पावसाच्या प्रदेशात दूध व्यवसाय हे वरदान असल्याने अशा संस्था आणि वरील अन्य व्यवसायाच्या विकासास मदत झाली आहे.

४. ग्रामीण भागाचा विकास

सहकारी दूध संस्थांच्या विकासामुळे शेतकरी आणि बिगर शेतकरी अशा दोन्ही गटांतील व्यक्तींना अर्थप्राप्तीचे नवीन साधन लाभले असून ग्रामीण जनतेच्या हातात पैसा आल्यामुळे त्यांच्या राहणीमानात सुधारणा होण्यास मदत झाली आहे. ऊस उत्पादनासाठी जशी मोठी गुंतवणूक करावी लागते तशी गुंतवणूक दूध व्यवसायात करावी लागत नाही. तसेच हा व्यवसाय पावसावर अवलंबून नसल्याने शेतकरी वर्गास शेतीपेक्षा दूध उत्पादन हा व्यवसाय लाभदायक वाटत आहे.

५. उत्पादनास योग्य भाव मिळण्यास मदत :

सहकारी क्षेत्रात दूध संस्था अस्तित्वात येण्यापूर्वी ग्रामीण भागात दूध व्यवसाय मर्यादित होता. परंतु दूध उत्पादकांना दुधास योग्य भाव मिळत नव्हता. तसेच उत्पादित दूध संघटितपणे नागरी भागात नेऊन विक्री करणे शक्य नव्हते. परंतु सहकारी दूध संस्थांमुळे दूध उत्पादकांना दुधातील फॅटच्या प्रमाणानुसार मूल्य मिळू लागले. तसेच दूध संग्रहण, दूध विक्री आणि प्रक्रियेची जबाबदारी दूध संघाने स्वीकारल्यामुळे दुधाची वाहतूक आणि संग्रहण करण्याची जबाबदारीही कमी झाली.

६. पत संस्थांच्या वसुलीस मदत:

सहकारी दूध संस्थांमुळे ग्रामीण जनतेच्या पतीच्या प्रमाणात वाढ झाल्याने शेतकऱ्यांना शेती, जनावरे खरेदी आणि अन्य कारणांसाठी घेतलेल्या कर्जाची वसुली करणे सुलभ झाले. त्यातून पत पुरवठा संस्थाचे कबाकीचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे.

सहकारी दूध संस्थांच्या पुढील समस्या (Problems)

१. दूध संस्थांत स्पर्धा :

एक गाव एक सहकारी दूध संस्था हे धोरण दूध संस्थांच्या विकासासाठी अनुसरले जात होते. दूध संस्थांची कार्यक्षमता व ता मजबूत राखणे हा त्यामागील उद्देश होता. परंतु अलीकडील काळात राजकीय ईशा तसेच गटातटाची राजकारणे यामुळे आता एकाच गावात अनेक दूध संस्था कार्य करू लागल्या आहेत. या संस्थांमधील स्पर्धेने या संस्थांची दूध संकलन कमी झाली आहे व त्या आर्थिकदृष्ट्या कमकुवत बनू लागल्या आहेत.

२. दूध संकलनाची समस्या :

प्राथमिक दूध संस्था गावातील दुधाचे संकलन करून ते जिल्हा संघाकडे पाठवितात. दुधाचे उत्पादन दिवसेंदिवस वाढत आहे. दूध संघाची दूध संकलनाची क्षमता ठरलेली आहे. त्यामुळे काही वेळेस अधिक दूध स्वीकारणे दूध संघांना अवघड जाते.

३. दूध साठविण्याची समस्या :

दूध हा नाशिवंत पदार्थ असल्याने त्याच्यावर ताबडतोब प्रक्रिया करावी लागते किंवा शीतगृहात ठेवावे लागते. दूध संघाने दूध नाकारल्यास शीतगृहाअभावी सभासदांना त्याचा साठा करणे अवघड जाते. त्यामुळे नुकसान सोसावे लागते.

४. भेसळ प्रवृत्तीत वाढ :

दुधाला मिळणारा चांगला भाव आणि मोठ्या शहरातून दुधाच्या वाढत जाणाऱ्या मागणीबरोबर दुधात भेसळ करण्याची प्रवृत्ती वाढत असून त्यामुळे दूध संस्थांद्वारे निर्भेळ दुधाचा पुरवठा करण्याच्या उद्देशाला तडा जात आहे.

५. खाजगी व्यावसायिकांची स्पर्धा :

दूध व्यवसायाद्वारे ताजा पैसा आणि अधिक नफा मिळत असल्याने खाजगी उद्योगांनी या क्षेत्रात प्रवेश केला असून सहकारी संस्थांना त्यांच्याकडून मोठी स्पर्धा होण्याची शक्यता आहे.

६. जुने तंत्रज्ञान :

दूध संघाकडे दुधावर प्रक्रिया करण्यासाठी वापरले जाणारे तंत्रज्ञान व यंत्रे जुनी असून त्यात बदल होणे आवश्यक आहे.

७. जनावरांच्या पैदाशीचे जुने तंत्र :

दूध उत्पादनात भारताचा पहिला क्रमांक असूनही विकसित देशांच्या तुलनेने जनावरांच्या पैदाशीचे तंत्रज्ञान जुने आहे..

८. प्रशिक्षण सोईची जाणीव:

जनावरे पाळणे, जनावरांची पैदास, दूध काढणे, संकलन, जनावरांची निगा इत्यादी बाबतीत शेतकरी वर्गास प्रशिक्षण देण्याच्या सोईंबाबत देशात पायाभूत सोईंची कमतरता जाणवते.

९. दूध संघाच्या खर्चात वाढ :

जिल्हा किंवा शहरी पातळीवर कार्य करणाऱ्या दूध संघाच्या व्यवस्थापन खर्चाचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे बऱ्याच संस्था नुकसानीत आहेत.

१०. शासनाचे अपुरे लक्ष :

सहकारी क्षेत्रातील प्रक्रिया उद्योगांपैकी साखर उद्योगाकडे शासनाचे अधिक लक्ष आहे. त्यामानाने दूध व्यवसायाच्या विकासाकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.

सहकारी दूध संस्थांच्या समस्यांवरील उपाययोजना

(Remedies to Problems)

१. अर्थक्षम संस्थांसाठी प्रयत्न :

देशातील सहकारी दूध संस्थांच्या बाबतीत गावपातळीवर चालू असलेली स्पर्धा अनिष्ट आणि या क्षेत्रास मारक आहे. राजकीय स्वार्थापोटी गावात एकापेक्षा अधिक दूध संस्था काढण्यास परवानगी देण्याचे धोरण त्यागणे आवश्यक आहे. या संस्था स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकतील यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२. दूध संकलनक्षमता वाढविणे :

भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात दुधाचा महापूर या योजनेला बरेच यश मिळाले आहे. दुधाचे उत्पादन वाढले आहे. परंतु त्यासाठी पुरेशी संकलनक्षमता उपलब्ध नाही. सरकारने दूध संघांना दूध संकलनक्षमता वाढविण्यासाठी परवानगी आणि मदत देणे आवश्यक आहे.

३. दूध प्रक्रियाक्षमतेत वाढ :

दुधावर त्याच्या उत्पादनानंतर लवकर प्रक्रिया करणे गरजेचे असते. महाराष्ट्रात होणारे दुधाचे उत्पादन लक्षात घेता अस्तित्वात असलेल्या प्रक्रियाक्षमतेवर बराच ताण पडतो. यासाठी प्रत्येक जिल्हा पातळीवर प्रक्रियाक्षमता वाढविणे गरजेचे आहे. त्यामुळे दूध उत्पादकांकडून सर्व दूध प्रक्रियेसाठी स्वीकारणे प्रक्रिया संस्थांना शक्य होईल. त्याचा फायदा दूध उत्पादकांना मिळू शकेल.

४. दूध प्रक्रिया संस्थांनी नीतिमत्ता जोपासणे :

दूध व्यवसायाचा होणारा विकास आणि त्यामुळे होणाऱ्या लाभामुळे प्रक्रिया संस्थांची दुधात व दूध पदार्थांत भेसळ करण्याची आणि दूध उत्पादनाची मानके (Standards) न सांभाळण्याची वृत्ती वाढत आहे. ही वृत्ती या व्यवसायास मारक आहे. सहकारी दूध प्रक्रिया संस्थांनी व्यावसायिक नीतिमत्ता जोपासावी तसेच दर्जा व गुणवत्तेबाबत निर्देशित मानके सांभाळावीत.

५. तंत्रज्ञानात बदल :

सहकारी दूध प्रक्रिया संस्था सध्या वापरत असलेले प्रक्रिया तंत्रज्ञान जुने आहे. त्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. या संस्थांना • खाजगी क्षेत्राकडून होणारी स्पर्धा वाढत असल्याने सहकारी दूध प्रक्रिया संस्थांनी आपल्या तंत्रज्ञानात बदल करणे अत्यंत आवश्यक आहे.

६. जनावरे पैदास व पोषण तंत्रात बदल :

जनावरांची पैदास आणि पोषण तंत्रज्ञानात गेल्या दशकात प्रचंड बदल झाले असून त्याची माहिती दूध संस्थांनी दूध उत्पादकांना देणे आवश्यक आहे. त्यामुळे दुधाचा दर्जा आणि उत्पादनात वाढ होण्यास मदत होऊ शकेल.

७. व्यवसाय प्रशिक्षण :

सहकारी दूध संस्थांनी जनावरे पाळणे, पैदास करणे, दूध उत्पादन, दूध संकलन इत्यादी बाबतीत दूध उत्पादकांना प्रशिक्षण देण्याच्या सोई केल्या पाहिजेत. त्यामुळे दूध व्यवसाय वाढीस मोठी मदत होईल.

८. शासकीय बंधने दूर करणे :

सोईसाठी दूध उत्पादन आणि संकलनाबाबत शासन बंधने घालते. त्याचा विपरीत परिणाम या व्यवसायावर होतो. उलट, शासनाने दूध उत्पादन, संकलन आणि प्रक्रिया या तिन्ही बाबतीत प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच दूध पदार्थांच्या निर्यातीसही प्रोत्साहन दिले पाहिजे.

९. खर्चावर नियंत्रण :

सहकारी क्षेत्रातील दूध व्यवसायाच्या वाढीबरोबर प्रक्रिया संस्थांच्या खर्चाच्या प्रमाणात वाढ होत आहे. हा खर्च वाढत राहिला तर दुधाला योग्य भाव देणे शक्य होणार नाही आणि त्याचा व्यवसायाच्या वाढीवर विपरीत परिणाम होईल. यासाठी सहकारी दूध संस्था आणि प्रक्रिया संस्थांनी आपला व्यवस्थापकीय खर्च कमी ठेवण्याचा प्रयत्न करावा.

१०. विकासासाठी प्रोत्साहन :

सहकारी दूध व्यवसायाच्या विकासासाठी राज्य शासनाने प्रोत्साहन दिले पाहिजे. राज्य दूध संघ आणि अखिल भारतीय सहकारी दूध फेडरेशनने सहकारी दूध संस्थांना नवीन तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले पाहिजे. तसेच दूध व्यवसायाच्या विकासाच्या संदर्भात मार्गदर्शन केले पाहिजे.

राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळ

(National Dairy Development Board - NDDB)

सदर संस्थेचा उद्देश देशातील दुग्ध व्यवसाय क्षेत्राचा विकास करणे हा होता. दुग्ध व्यवसाय विकास मंडळ कायदा, १९८७ द्वारे सदर संस्थेला राष्ट्रीय महत्त्वाची संस्था या रूपात वैधानिक दर्जा देण्यात आला. राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाचे मुख्य कार्यालय आनंद, गुजरात येथे असून देशभरात अनेक ठिकाणी प्रादेशिक कार्यालये आहेत. राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाद्वारे भारतात दुग्ध क्रांतीसाठी दुग्धपूर (Operation Flood) ही योजना राबविण्यात आली. सदर योजना तसेच भारतातील सहकारी दुग्ध क्षेत्रातील संस्थांच्या प्रयत्नांमुळे आज भारत हा जगातील सर्वात जास्त दूध उत्पादन करणारा देश बनला आहे.

राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाचे व्यवस्थापन

(Management of NDDB)

(अ) अध्यक्ष : अध्यक्ष हा संचालक मंडळाचा प्रमुख असतो.

(ब) संचालक मंडळ : यामध्ये केंद्र सरकारने अध्यक्षांशी सल्लामसलत केल्यानंतर नेमण्यात आलेल्या संचालकांचा समावेश असेल, ज्यामधील एक संचालक हा केंद्र सरकारी अधिकाऱ्यातून नेमलेला असेल, दोन संचालक हे राज्य सहकारी दुग्ध महासंघाच्या अध्यक्षांपैकी असतील आणि एक संचालक राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाबाहेरील सदर क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती असेल.

(क) राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाच्या सर्वोच्च दर्जाच्या अधिकाऱ्यातील जास्तीतजास्त तीन व्यक्ती पूर्णवेळ संचालक म्हणून कार्य करतील.

राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळ अधिकार आणि कार्ये

(Powers and functions of NDDB)

राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळ कायदा १९८७ मधील अध्याय ४ नुसार राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाचे अधिकार आणि कार्य पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) सदर कायद्यातील तरतुदींना अनुसरून देशातील दुग्ध व्यवसाय, कृषी क्षेत्र इत्यावर आधारित जैविक आणि इतर उद्योग यांच्या राष्ट्रीय स्तरावरील सर्वांगीण विकासासाठी आवश्यक कार्यक्रमांचे नियोजन आणि त्यांची अंमलबजावणी करणे, त्यात साहाय्य करणे, तसेच यासाठी कायद्याने प्राप्त अधिकारांचा वापर करून आवश्यक पावले उचलणे. सदर कार्यपूर्तीसाठी सहकारी रणनीतीचा वापर करण्याची जबाबदारी मंडळावर असेल.

(ब) कायद्यातील तरतुदींना अनुसरून त्यांच्यासंबंधी कोणताही विशेष पूर्वग्रह न बाळगता खालील कार्य करणे.

१. दुग्धशाळा, रोगप्रतिकार विज्ञान, पशुसंवर्धन, शेती आणि फलोत्पादन क्षेत्रात संशोधन आणि विकास कार्यक्रम राबविण्यासाठी सुविधा पुरविणे.

२. सहकारी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांना दूध व दुग्धजन्य उत्पादनांचे उत्पादन खरेदी, संरक्षण आणि विपणनविषयक तंत्रज्ञानाची माहिती देणे.

३. तंत्रज्ञानाच्या वापरविषयक माहिती आत्मसात करून त्याचा उपयोग करण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.

४. डेअरी उद्योगांची रचना, नियोजन, प्रोत्साहन, विकास, बांधकाम, प्रायोजक, स्थापना आणि तत्सम विकासविषयक इतर कोणतीही कृती ज्यामध्ये वित्तपुरवठ्याचासुद्धा समावेश असेल.

५. दूध आणि दुधाचे पदार्थ साठवण, वाहतूक, प्रक्रिया, दूध आणि दुधाच्या उत्पादनांचे वितरण यांसारख्या अविभाज्य सेवा पुरविणे आणि संदर्भित आघाडीची संस्था म्हणून काम करणे. सल्लागार आणि व्यवस्थाकीय सेवा प्रदान करणे आणि कोणत्याही प्रकल्पाची कार्यवाही करण्यासाठी मदत करणे.

६. दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे संवर्धन तसेच कोणत्याही टप्प्यावर त्यांची होणारी नासाडी टाळणे, दूध व दुग्धजन्य उत्पादनांचे प्राथमिक उत्पादक तसेच यासाठी सहकारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील कार्यरत व्यक्तींना प्रोत्साहन दर मिळवून देण्यासाठी मदत करणे आणि राष्ट्रीय स्तरावरील दुग्ध जाळे (Grid) निर्मितीसाठी व्यावहारिक उपायांचा अवलंब करणे.

७. आवश्यकतेनुसार दुधाच्या खरेदी-विक्री संदर्भातील कमाल व किमान किमतीबाबत शासनाला शिफारशी करणे आणि अशा किमतीच्या अंमलबजावणीसाठी शासनाला मदत करणे.

८. दूध आणि दुधाचे पदार्थ आणि दुधाळ जनावरे किंवा बैलांच्या आयात आणि निर्यातीच्या संदर्भात मध्यस्थ संस्था म्हणून कार्य करणे.

९. उच्च उत्पन्न देणाऱ्या गुरांच्या संवर्धनासाठी जनावरांच्या पैदास करण्याच्या सुधारित पद्धतींचा अवलंब करण्यासाठी चारा आणि उत्कृष्ट व सुधारित पशुखाद्य उत्पादन व पुरवठा वाढविण्यासाठी तसेच देशातील पशुधन संपत्तीतील वाढीसाठी आर्थिक, तांत्रिक, प्रशासकीय, व्यवस्थापकीय किंवा इतर साहाय्य प्रदान करणे किंवा त्यासाठी गरजेनुसार उपयुक्त असे उपाय योजणे.

१०. आवश्यकतेनुसार उपलब्ध संस्थांच्या वापराद्वारे दूध व दुग्धजन्य उत्पादना संदर्भातील तंत्रज्ञान, औद्योगिक आणि आर्थिक संशोधन प्रकल्पांना प्रोत्साहन देणे व वित्त पुरवठा करणे.

११. देशव्यापी स्तरावर दूध व दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, संवर्धन, वितरण आणि वापरास चालना देण्यासाठी इच्छुक वा कार्यरत सहकारी वित्त महामंडळ, सहकारी संघ किंवा सहकारी संस्था किंवा सहकारी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील अशा कोणत्याही योजनेस (भांडवल योगदानासह) संचालक मंडळ योग्य वाटेल अशा प्रकारे वित्तपुरवठा करणे.

१२. दुग्धशाळा व त्यासंबंधित उद्योगांचे नियमन करणे आणि त्याकरिता केंद्र सरकारच्या आवश्यकतेनुसार नियामक प्राधिकरण म्हणून काम करणे.

१३. दुग्ध व दुग्धजन्य उत्पादनांच्या उत्पादनात संलग्न संघटनांच्या विकासासाठी आणि त्यांच्यातील समन्वयासाठी आवश्यक उपाययोजनांचा अवलंब करणे व त्याद्वारे प्राथमिक दुग्ध उत्पादकांना सदर क्षेत्राच्या विकास आणि वाढीतील लाभार्थी बनविणे.

१४. राष्ट्रीय दुग्धग्रिडच्या कार्यक्षम व्यवस्थापनासाठी आवश्यक असणारी माहिती व आकडेवारी गोळा करणे.

१५. व त्यासंबंधित उद्योगांशी संबंधित संशोधन व विकास कार्यांना प्रसिद्धी देणे.

१६. देशाच्या विविध भागांत दूध आणि दुग्धजन्य उत्पादनांचे उत्पादन, दर्जानुसार वर्गवारी आणि त्यांच्या विपणन कार्याला प्रोत्साहन देणे आणि त्यांचा विकास करणे.

१७. आंतरराष्ट्रीय संस्था आणि परदेशी तज्ज्ञांशी सहकार्य करणे तसेच दुग्धजन्य उत्पादनांच्या कोणत्याही भेटवस्तू अथवा खाद्यपदार्थ स्वरूपातील प्राप्ती संदर्भात त्यांचे स्वागत, उपयोग आणि वितरण यासाठी केंद्र सरकारचा प्रतिनिधी म्हणून काम करणे.

१८. मूलभूत वस्तूंचा राखीव साठा निर्मित करणे.

१९. दूध व दुग्धजन्य उत्पादनांचा अपव्यय टाळणे तसेच जनहिताच्या दृष्टिकोणातून सदर पदार्थांच्या निर्यातीला प्रोत्साहन देणे.

२०. व्यवसायाच्या उद्देशाने मालमत्तेचे अधिग्रहण करणे, मालमत्ता धारण करणे अथवा त्याची विल्हेवाट लावणे.

२१. राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाकडून मदत घेत असलेल्या कोणत्याही संस्थेच्या संबंधात त्यांच्या व्यवस्थापकीय, तांत्रिक किंवा इतर कार्याचा संपूर्ण किंवा कोणताही भाग हस्तांतरित करणे.

२२. स्थावर अथवा जंगम मालमत्तेच्या आधारावर कर्ज देणे, अथवा पैशाचा पुरवठा करणे.

२३. संचालक मंडळास योग्य वाटेल अशा तारणाच्या आधारावर कर्ज घेणे.

२४. स्वतः अथवा इतर कोणत्याही संस्थेमार्फत विसर्जित कंपनी अथवा इतर संस्थेमार्फत चालविला जाणारा व्यवसाय पुढे चालू ठेवणे.

२५. दुग्जजन्य पदार्थ व इतर खाद्य पदार्थांच्या उत्पादनात कार्यरत सहकारी क्षेत्रातील संस्थांद्वारे होणाऱ्या प्रयत्नास प्रोत्साहन देणे.

२६. राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाने दिलेल्या कोणत्याही मदतीसाठी किंवा सेवांसाठी शुल्क आकारणे.

२७. राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाच्या उद्दिष्टपूर्तीकरिता प्रासंगिक किंवा अनुकूल अन्य कोणताही व्यवसाय करणे किंवा आवश्यक असणारी कोणतीही कृती किंवा आवश्यक गोष्टी करणे.